# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय सोलापूर
## (गृह शाखा)

दुरध्वनी क्र. ०२१७- २७३१०२१,                                   Email-id-dcbsolapur@gmail.com

---

क्र. २०२१/डिसीबी/२/आरआर/ १७४५                                                                 दिनांक- १६/०४/२०२१

**(फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये)**

**आदेश**

ज्याअर्थी, मा. भारत निवडणूक आयोग यांचेकडील जाहीर कार्यक्रमानुसार पंढरपूर विधानसभा मतदारसंघाचे पोट निवडणूक प्रक्रिया राबविण्यात येत आहे. सदर विहीत करण्यात आलेल्या कार्यक्रमानुसार दिनांक १७.०४.२०२१ रोजी मतदान असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. २५२ पंढरपूर विधानसभा मतदार संघाची निवडणूक ही विनाअडथळा व भयमुक्त वातावरणात आणि नि:पक्षपातीपणे पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून मतदार संघाचे हद्दीतील मतदान प्रक्रिया सुरु होण्याच्या पुर्वी खालील नमुद केलेली कृत्ये करणेस प्रतिबंध करण्याची आवश्यकता असलेबाबत माझे निदर्शनास आले आहे.

त्याअर्थी, मी मिलिंद शंभरकर, जिल्हादंडाधिकारी, सोलापूर फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १९७३ चे कलम १४४ अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन असा आदेश देतो की, सोलापूर जिल्ह्यातील २५२ पंढरपूर विधासनभा मतदार संघाचे मतदान दिनांक १७.०४.२०२१ असुन सदर दिवशी सकाळी ०६.०० वाजलेपासून ते मतदान प्रक्रिया संपेपर्यंत पंढरपूर मतदार संघातील मतदान केंद्र ठिकाणापासून २०० मीटर परिसरात खालील सर्व कृती करण्यास मनाई करीत आहे.

१. परिसरात मंडप टाकणे, सर्व प्रकारची दुकाने चालु ठेवणे, ध्वनीक्षेपकांचा वापर करणे, निवडणूकीच्या कामकाव्यतिरिक्त खाजगी वाहने वापरणे, मोबाईल व इतर सर्व प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांचा वापर करणे, चिन्हांचे प्रदर्शन करणे.

सदर आदेशाचा कोणी कोणत्याही प्रकारे भंग केल्यास, ती व्यक्ती भारतीय दंड संहितेच्या कलम १८८ प्रमाणे शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश दिनांक १६.०४.२०२१ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिला असे.

DISTRICT MAGISTRATE जिल्हा दंडाधिकारी SOLAPUR

(मिलिंद शंभरकर)
**जिल्हादंडाधिकारी सोलापूर**

स्थळ :- सोलापूर
दिनांक :- १६/०४/२०२१

प्रत:- पोलीस अधिक्षक सोलापूर ग्रामीण यांचेकडे प्रसिध्दीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
प्रत:- उपविभागीय दंडाधिकारी पंढरपूर यांना माहितीसाठी.
प्रत:- व्यवस्थापक,येरवडा मध्यवर्ती कारागृह मुद्रणालय, पुणे. यांचेकडे राजपत्रात प्रसिध्द करणेसाठी सस्नेह अग्रेषित.
प्रत:- जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर यांना सर्व स्थानिक प्रमुख वृत्तपत्रात प्रसिध्द करणे कामी.
प्रत:- तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, पंढरपूर/ सांगोला/ मंगळवेढा यांचेकडे माहितीसाठी अग्रेषित.
प्रत :- उप जिल्हा निवडणूक अधिकारी, सोलापूर यांचेकडे माहितीस्तव.